# Shivaji University Zonal Wrestling Competition 2016-2017

Shivaji University Zonal(Freestyle) Wrestling Competition 2016-17 Shivaji University Zonal Freestyle Wrestling Competition was organized by VitthalraoPatil College on 4th, 5th, Dec 2016. About 150 players from 40 colleges participated in it. VitthalraoPatil College won the Greco-Roman General Championship with 13 points while Radhanagari College Radhanagari won the Freestyle General Championship with 20 points. The competition was inaugurated by Hon'ble Ajit Narke Saheb It was done by.

## मंडलिक महाविद्यालयास विजेतेपद

### स. ब. खाडे महाविद्यालयास उपविजेतेपद : विभागीय कुस्ती स्पर्धा

**कळे : वार्ताहर**

शिवाजीविद्यापीठविभागीयकुस्ती स्पर्धा विठ्ठलराव महाविद्यालयाच्या वतीने युवराज पाटील कुस्ती संकुल कुडित्रे या ठिकाणी पार पडल्या. यामध्ये सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाने सर्वसाधारण विजेतेपद तर स. ब. खाडे महाविद्यालयाने उपविजेतेपद मिळवले. स्पर्धेमध्ये ४० महाविद्यालयांतील १५० कुस्ती मल्लांनी सहभाग घेतला.

स्पर्धेचे उद्घाटन कुंभी बँकेचे अध्यक्ष अजित नरके व कुंभी कारखान्याचे उपाध्यक्ष किशोर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थापक विठ्ठल पाटील, प्राचार्य डॉ. बी. एम. लाडगावकर, विभागीय सेक्रेटरी प्रा. एस. एल. गोनूंगडे, म. रा. कुस्तीगीर परिषदेचे विभागीय सेक्रेटरी पै. संभाजीराव वरूटे, शा. शि. संचालक प्रा. व्ही. एस. यमगेकर उपस्थित होते. नाईक कॉलेज, इचलकरंजी यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

स्पर्धेमध्ये पंच म्हणून जिल्हा तालीम संघाचे संभाजी वरूटे, प्रा. बाजीराव पाटील, संभाजी पाटील, राजाराम चौगले, बबन चौगले, प्रा. रघुनाथ मोरे, तानाजी पाटील, प्रकाश पाटील, बाबासो शिरगावकर, दादू चौगले (छोटा) यांनी काम पाहिले. बक्षीस वितरण संस्था संचालक राहुल पाटील, प्रा. गोनुगडे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब लाडगावकर, प्रा. नितीन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. सुनील पाटील, प्रा. एन. आर. कांबळे, प्रा. देवेंद्र बिरनाळे, प्रा. प्रशांत पाटील, प्रा. पी. एस. खाडे, प्रा. डॉ. ए. ए. वणिरे, प्रा. बाजीराव पाटील, प्रा. मुल्ला, प्रा. एन. डी. पाटील उपस्थित होते. स्पर्धेचे संयोजन वि. पा. महाविद्यालयाचे शा. शि. संचालक प्रा. व्ही. एस. यमगेकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. कमलाकर राक्षसे यांनी केले. प्रा. महादेव जाधव यांनी आभार मानले.



**कळे : शिवाजी विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धेतील सर्वसाधारण विजेते सदाशिवराव मंडलिक मुरगूड महाविद्यालयास चषक देताना प्राचार्य डॉ. बाळासाहेब लाडगावकर, राहुल पाटील, प्रा. यमगेकर व अन्य मान्यवर.**

स्पर्धेचा निकाल असा - ५७ किलो - स्वप्निल इंदुलकर (मुरगूड), संतोष हिरूगडे (मुरगूड), नितीन कांबळे (कुरुकली). ६१ किलो - प्रताप पाटील (शहाजी कॉलेज), वैभव लेंढे (मुरगूड), वैभव यादव (बिद्री). ६५ किलो - अक्षय हिरूगडे (मुरगूड), ऋषिकेश घराळ (न्यू कॉलेज), शुभम पाटील (हुपरी). ७० किलो - स्वप्निल पाटील (कोपार्डे), ओंकार लंबे (मुरगूड), जोतिराम पाटील (कोपार्डे), ७४ किलो- ऋषिकेश पाटील (कुरुकली), कृष्णात कांबळे (मुरगूड), भगतसिंग खोत (कळे), ८६ किलो- भैरू माने (कोपार्डे), विश्वजित कदम (वाशी), सतीश आडसुळे (मुरगूड), ९७ किलो- संतोष लव्हटे (इचलकरंजी), उदय पाटील (बिद्री), बाळासो पुजारी (इचलकरंजी), उदय पाटील (बिद्री), बाळोसो पुजारी (इचलकरंजी), उदय पाटील (बिद्री), बाळासो पुजारी (इचलकरंजी) ९७+ किलो- हर्षवर्धन थोरात (कोपार्डे), शुभम सिदनाळे (इचलकरंजी), जगन्नाथ ढेरे (शाहू कॉलेज).